जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक १९६ | गुरुवार, ५ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER


## लोणी काळभोर गटात विकासकामांचा फॅक्टरच विजयाची गुरुकिल्ली ठरणार : गायकवाड

**लोणी काळभोर, ता. ४ :** राज्यभर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना पुणे जिल्ह्यातील लोणी काळभोर जिल्हा परिषद गट सध्या राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे. या गटात भाजपच्या ठोस विकासकामांचा फॅक्टरच विजयाची गुरुकिल्ली ठरणार असून तिन्ही उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येतील, असा ठाम विश्वास कदम वाकवस्तीचे माजी सरपंच चित्तरंजन गायकवाड यांनी व्यक्त केला.

जिल्हा परिषदेसाठी पूनम गायकवाड, लोणी काळभोर पंचायत समिती गणातून श्वेता काळभोर आणि लोणी काळभोरकदम वाकवस्ती गणातून ज्ञानेश्वर नामुगुडे हे भाजपचे उमेदवार रिंगणात असून, या तिघांच्या प्रचारासाठी गायकवाड पूर्ण ताकदीने मैदानात उतरले आहेत. भाजपच्या अंत्योदयाच्या विचारधारेतून शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.



पुणे प्राईम न्यूजशी बोलताना गायकवाड म्हणाले, भाजपचे तिन्ही उमेदवार नवखे असले तरी ते एकसंध टीम म्हणून काम करत आहेत. राजकीय वारसा नसल्या मुळे वैयक्तिक स्वार्थ नाही-फक्त विकासाचाच अजेंडा आहे. कदम वाकवस्ती परिसरात गेल्या आठ वर्षांत जवळपास पावणे दोनशे कोटी रुपयांची विकासकामे झाल्याचा दावा करत त्यांनी मतदारांच्या अपेक्षेपेक्षा अधिक काम झाल्याचे ठासून सांगितले.

महिला सक्षमीकरणावर भर देत त्यांनी सांगितले की, २०१७ते २०२२ या काळात गौरी चित्तरंजन गायकवाड यांच्या माध्यमातून सव्वाशे कोटींहून अधिक विकासकामे झाली. यामध्ये १५२० किमी सिमेंट काँक्रेट रस्ते, १५२० किमी ड्रेनेज लाईन, संपूर्ण गावात स्ट्रीट लाईट, तसेच १४२ कोटींची पाणीपुरवठा योजना यांचा समावेश आहे. नवपरिवर्तन फाउंडेशन व भाजप कार्यालयाच्या माध्यमातून २२ हजार नागरिकांना उज्ज्वला गॅस, लाडकी बहीण, ई-श्रम कार्ड, प्रधानमंत्री आवास, आयुष्यमान कार्ड यांसारख्या केंद्रराज्य योजनांचा थेट लाभ मिळवून देण्यात आला आहे.

पुढील टप्प्यात लोणी काळभोर गटातील तिन्ही गावांचा संतुलित विकास, निधीचे शास्त्रीय नियोजन आणि सर्व समाजघटकांचा समावेश असलेला विकास आराखडा राबवला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. विरोधकांवर जोरदार टीका करताना गायकवाड म्हणाले, खोटे आरोप करण्यापलीकडे विरोधकांनी लोकसंख्या नियोजन, कचरा प्रकल्प किंवा ठोस विकास आराखड्यावर काहीच केलेले नाही.


झेडपी शाळा देशाचे नेतृत्व घडवणाऱ्या केंद्रांमध्ये रूपांतरित व्हाव्यात, आरोग्यस्वच्छतापर्यावरण आणि कचरा व्यवस्थापन प्रकल्प मार्गी लावले जातील, तसेच कदम वाकवस्तीला पुणे शहरासारखी विकसित करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. महिला सुरक्षेसाठी सीसीटीव्ही, कर्मचारी व वाहन व्यवस्था, युवकांसाठी उद्योजकता प्रशिक्षण, उद्योग आणण्यासाठी प्रयत्न, शेतकऱ्यांसाठी एफपीसी, रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्यसेवा आणि मुख्यमंत्री सहायता निधीचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचवण्यावर विशेष लक्ष दिले जाईल, असा दावा त्यांनी केला. तसेच भावनिक मुद्यांना बळी न पडता विकासाला मतदान करा. ज्यांनी काम केले, त्यांनाच साथ द्या. लोणी काळभोर गटात भाजपच्या तिन्ही उमेदवारांना कौल देण्याची साद गायकवाड यांनी जनतेला घातली.

# राष्ट्रवादीला विजयी करून श्रद्धांजली अर्पण करा : आमदार माऊली कटके

## अजित पवार यांच्या विचारांचे शेवटचे उमेदवार

**लोणी काळभोर, ता. ४ :** थेऊर-आव्हाळवाडी जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार हे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विचारांचे असून दादांनी उमेदवारी घोषित केलेले हे शेवटचे उमेदवार आहेत. त्यामुळे सर्व नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करून अजितदादांना खरी श्रद्धांजली अर्पण करावी. असे भावनिक आवाहन शिरूर हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके यांनी केले.

कुंजीरवाडी (ता. हवेली) येथे जिल्हा परिषद उमेदवार कोमल आव्हाळे व पंचायत समिती उमेदवार आरोग्यदूत युवराज काकडे यांच्या उपस्थितीत अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आयोजित शोकसभेत ते बोलत होते. यावेळी कुंजीरवाडीचे माजी सरपंच सचिन तुपे, संतोष कुंजीर, माजी पंचायत समिती सदस्य







बाळासाहेब चौधरी, हिरामण काकडे, काळूराम कांबळे, मारुती कुंजीर, मोरेश्वर काळे, अरुण घुले, राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस गुलाब चौधरी, तालुकाध्यक्ष दिलीप वाल्हेकर, भारतीताई शेवाळे, मोरया कुंजीर यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार कटके म्हणाले, युवराज काकडे, कोमल आव्हाळे व सुषमा मुरकुटे ही काम करणारी आणि हक्कासाठी लढणारी माणसे आहेत. अजितदादांच्या निधनानंतर ही निवडणूक होत आहे. स्वतःच्या कुटुंबातील दुःख बाजूला ठेवून उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी संपूर्ण महाराष्ट्रालाच आपले कुटुंब मानून निर्णय घेतला आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना विजयी करून अजितदादांना श्रद्धांजली अर्पण करावी. दरम्यान, हवेलीतील प्रत्येक गावासाठी वाढीव विकासनिधी उपलब्ध करून देण्यात येणार असून, येत्या काळात अर्थखाते सुनेत्रा पवार यांच्याकडे येण्याची शक्यता आहे.

भैरोबानाला ते यवत एलिव्हेटेड ब्रिज तसेच पुणेलोणी काळभोरउरुळी कांचन मेट्रो हे अजितदादांचे महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकार होतील. त्यामुळे कुणाच्याही भूलथापांना बळी न पडता राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांनाच विजयी करा, असेही कटकेयांनी ठणकावून सांगितले.

> माझ्या रक्तातच राष्ट्रवादी काँग्रेस आहे. घड्याळ सोडून दुसरा विचारच आम्ही करू शकत नाही. अजितदादांशी माझे वेगळे नाते होते. मी पवार कुटुंबासोबत ठामपणे उभा आहे. अनेकांनी संपर्क केला, पण आम्ही राष्ट्रवादीच्या उमेदवारांसाठीच काम करणार.
> - **सरपंच सचिन,** माजी सरपंच कुंजीरवाडी, ता. हवेली

> राष्ट्रवादीचा परिवार म्हणून आम्ही खंबीरपणे उमेदवारांच्या पाठीशी आहोत. अजितदादांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे. त्यामुळे यावेळी नागरिक राष्ट्रवादी सोडून दुसऱ्या विचारांना थारा देणार नाहीत. कुंजीरवाडीतून जास्तीत जास्त मते घड्याळाला देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.
> - **संतोष कुंजीर,** माजी सरपंच कुंजीरवाडी, ता. हवेली

## सर्वांगीण विकासासाठी भाजपच्या तीनही उमेदवारांना निवडून द्या : माधुरी काळभोर

**लोणी काळभोर, ता. ४ :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी सध्या शिगेला पोहोचली असून लोणी काळभोर गट व गणात भाजपने प्रचारात स्पष्ट आघाडी घेतली आहे. घराघरांत, वाड्या-वस्त्यांवर आणि चौकाचौकांत भाजपच्या उमेदवारांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असून परिवर्तनाची लाट स्पष्टपणे दिसून येत आहे. भाजपच्या वतीने यंदा प्रामाणिक चेहरे, नवे नेतृत्व आणि काम करण्याची ठोस क्षमता असलेल्या तीनही उमेदवारांना संधी देण्यात आली आहे. विकासाची ठोस दिशा, पारदर्शक कारभार आणि जनतेशी थेट संवाद ही भाजपची ताकद असून याच जोरावर लोणी काळभोर गटात भाजपचा विजय निश्चित आहे. असा ठाम विश्वास माजी सरपंच माधुरी काळभोर यांनी व्यक्त केला.



पुढे बोलताना माधुरी काळभोर म्हणाल्या की, गेल्या अनेक वर्षांत काही मंडळींनी केवळ आश्वासनांची पेरणी केली. प्रत्यक्षात मात्र विकासाला खीळ बसवली. भाजपने नेहमीच कामातून विश्वास जिंकला आहे. रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण आणि मूलभूत सुविधांसाठी भाजप कटिबद्ध आहे. त्यामुळे सर्वांगीण विकासासाठी भाजपच्या तीनही उमेदवारांना प्रचंड मतांनी निवडून देणे गरजेचे आहे.

भाजपकडून जिल्हा परिषदेसाठी पूनम गायकवाड, लोणी काळभोर-वडकी पंचायत समिती गणातून श्वेता काळभोर आणि लोणी काळभोर कदमवाकवस्ती गणातून ज्ञानेश्वर नामुगुडे हे भाजपचे उमेदवार रिंगणात असून, या तिघांच्या प्रचारासाठी गायकवाड पूर्ण ताकदीने मैदानात उतरले आहेत. भाजपचे उमेदवार प्रत्येक मतदारांपर्यंत पोहोचत असून स्थानिक प्रश्न समजून घेत ठोस आराखडा मांडत आहेत. युवकांना रोजगार, महिलांना स्वावलंबन, शेतकऱ्यांना आधार आणि ज्येष्ठ नागरिकांना सन्मान ही भाजपची स्पष्ट भूमिका आहे. याउलट विरोधकांकडे केवळ टीका आणि दिशाहीन राजकारणाशिवाय काहीही उरलेले नाही, अशी टीका माधुरी काळभोर यांनी केली.

लोणी काळभोर परिसरात भाजपच्या प्रचार सभांना मोठी गर्दी होत असून नागरिकांचा वाढता पाठिंबा पाहता वातावरण भाजपमय झाले आहे. जनतेने यावेळी सक्षम नेतृत्वाला संधी देण्याचा निर्धार केला असून भाजपचे तीनही उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील,विकासासाठी मतदान करा, भाजपच्या तीनही उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन माजी सरपंच माधुरी काळभोर यांनी शेवटी केले नाहे.

## तिन्ही उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्या : सुदर्शन चौधरी यांचे आवाहन

**उरुळी कांचन, ता. ४ :** दौंडचे आमदार राहुलदादा कुल व भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रदीपदादा कँद्ध यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली लोणी काळभोर परिसरात गेल्या काही वर्षांत विविध विकासकामांना मोठी गती मिळाली असून ही विकासाची घोडदौड भविष्यातही अखंड सुरू राहणार आहे. सर्वांगिण विकास हाच भारतीय जनता पक्षाचा मुख्य अजेंडा असून सुजलामसुफलाम उरुळी कांचन घडवण्याचा भाजपचा निर्धार आहे. उरुळी कांचन व परिसराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी भाजप कटिबद्ध असून मतदारांनी आमच्या पाठीशी ठामपणे उभे राहून तिन्ही उमेदवारांना विजयी करावे, असे आवाहन भाजपचे उरुळी कांचनसोरतापवाडी पंचायत समिती गणातील अधिकृत उमेदवार सुदर्शन चौधरी यांनी केले.



विशेषतः जेष्ठ नागरिकांसाठी आरोग्यदायी व सन्मानित जीवन सुनिश्चित करण्याचा संकल्प त्यांनी जाहीर केला. यामध्ये दरवर्षी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, जेष्ठ नागरिकांना मोफत जीवनोपयोगी साहित्य वाटप, गावात नियमित मनोरंजन, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच जेष्ठ नागरिकांसाठी घरपोच बस, एस.टी. व रेल्वे प्रवासाचे पास उपलब्ध करून देण्याची योजना राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विश्वासाची परंपरा आणि आरोग्याची ठोस हमी देणारे नेतृत्व भाजपकडे आहे. प्रत्येक जेष्ठ नागरिकाच्या आरोग्यदायी जीवनाची जबाबदारी माझी असेल, असे आश्वासन देत चौधरी यांनी जनतेशी थेट संवाद साधला.

दरम्यान,आगामीनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या तिन्ही अधिकृत उमेदवारांना मायबाप जनतेने आशीर्वादरूपी मत देऊन प्रचंड बहुमताने विजयी करावे, असे भावनिक आवाहनही त्यांनी केले. विकास, पारदर्शकता व जनतेच्या विश्वासावर आधारित राजकारण हीच भाजपची ओळख असून लोणी काळभोरच्या उज्वल भविष्यासाठी भाजपच सक्षम पर्याय असल्याचा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उरुळी कांचन जिल्हा परिषद गटातून भाजपचे उमेदवार शंकर बडेकर हे विद्यमान सदस्य असून, त्यांच्या कार्यकाळात समाजाच्या सर्व घटकांसाठी अनेक भरीव व लोकाभिमुख विकासकामे झाली आहेत. उरुळी कांचन पंचायत समिती गणातून भाजपच्या उमेदवार सारिका लोणारी या निवडणुकीच्या मैदानात उतरल्या असून, त्यांना नागरिकांचा उत्स्फुर्त पाठिंबा मिळत आहे. माझ्यासह भाजपचे तिन्ही उमेदवार सातत्याने जनतेच्या हितासाठी काम करत आले आहेत. विकासावर विश्वास ठेवणारी जनता आज भाजपच्या पाठीशी भक्कमपणे उभी आहे. त्यामुळे यावेळी उरुळी कांचन गटात भाजपचाच झेंडा दिमाखात फडकणार! असा ठाम विश्वास सुदर्शन चौधरी यांनी व्यक्त केला आहे.

## लोणी काळभोरमध्ये राष्ट्रवादीचाच विजय होणार : माजी सरपंच शरद काळभोर

**लोणी काळभोर, ता. ३ :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लोणी काळभोर गट व गणात राजकीय वातावरण तापले असताना, राष्ट्रवादी काँग्रेसने स्पष्ट व निर्णायक आघाडी घेतल्याचे चित्र दिसत आहे. लोणी काळभोरचे माजी सरपंच तथा ज्येष्ठ नेते शरद काशिनाथ काळभोर यांनी या निवडणुकीत लोणी काळभोरमध्ये राष्ट्रवादीचाच विजय निश्चित आहे, असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे.

पुढे बोलताना शरद काळभोर म्हणाले की, लोणी काळभोरच्या जनतेने मला सरपंच म्हणून साडेसात वर्षे आणि उपसरपंच म्हणून तब्बल दहा वर्षे सेवा करण्याची संधी दिली. या काळात कुठल्याही घटकाला दुजाभाव न करता सर्वसम ावेशक विकास साधला. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ग्रामविकास मंत्री विजयसिंह मोहिते असताना गावात



विकासाची गंगा वाहिली. बंदिस्त गटात विविध योजना राबविण्यात आल्या, पुणेसोलापूर महामार्ग ते गावापर्यंत रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले, स्मशानभूमीसाठी शेड उभारण्यात आली, तसेच नागरिकांसाठी पाण्याच्या टाकीचे काम करण्यात आले, असे त्यांनी सांगितले.

लोणी काळभोरच्या विकासाचा इतिहास पाहिला, तर तो राष्ट्रवादी काँग्रेसशिवाय अपूर्ण आहे, असे ठाम पणे सांगत शरद काळभोर म्हणाले की, रस्ते, पाणीपुरवठा, वीज, आरोग्य, शिक्षण, वाड्या-वस्त्यांचा विकास, तसेच शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने काम करणारा पक्ष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस आहे. ही कामगिरी जनतेने प्रत्यक्ष अनुभवली आहे आणि त्यामुळेच आज जनतेचा कौल राष्ट्रवादीकडे झुकलेला आहे.

सध्या प्रचाराच्या रणधुमाळीत राष्ट्रवादी काँग्रेसने घराघरांत पोहोचत थेट संवाद साधण्यावर भर दिला आहे. उमेदवारांच्या प्रचाराला नागरिकांचा उत्स्'र्त प्रतिसाद मिळत असून, वाड्या-वस्त्यांवरून ग्रामीण भागापर्यंत घड्याळ चिन्हाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. जनतेशी असलेला विश्वासाचा धागा हेच आमचे सर्वात मोठे भांडवल आहे, असे शरद काळभोर यांनी सांगितले.

## दलबदलू संधीसाधूंना जनता धडा शिकवणार; संजय गायकवाड यांचा खणखणीत इशारा

**लोणी काळभोर, ता. ४ :** राष्ट्रवादी काँग्रेसकडून विकासाची कामे करून घेऊन, पदे उपभोगून आणि तिकीटे मिळवून आज उमेदवारीसाठी जातीयवादी पक्षात धाव घेणाऱ्या दलबदलूंना जनता थारा देणार नाही, असा खणखणीत इशारा जिल्हा परिषदेचे माजी सदस्य संजय गायकवाड यांनी दिला आहे.

लोणी काळभोर परिसरात आज जे भाजपचे तथाकथित प्रचार प्रमुख व नेते फिरत आहेत, त्यांनीच कालपर्यंत राष्ट्रवादीच्या व्यासपीठावर उभे राहून पदे घेतली. सरपंच ते उपसभापतीपर्यंतची पदे भूषवली. जिल्हा परिषद व पंचायत समितीची तिकीटे राष्ट्रवादीकडून मिळवली. अजितदादांकडे जाऊन गावासाठी रस्ते, पाणीपुरवठा, वीज, सभागृह, विकासकामे करून घेतली. इतकेच नव्हे तर स्वतःच्या वैयक्तिक कामांसाठीही राष्ट्रवादीच्या नेत्यांचे उंबरठे झिजवले. आता केवळ उमेदवारीसाठी जातीयवादी पक्षात सामील होऊन राष्ट्रवादीवर टीका करत आहेत, ही निव्वळ ढोंगबाजी असल्याचे गायकवाड यांनी ठणकावून सांगितले.

अजित दादांनी कधीही जात, धर्म किंवा पक्ष पाहून काम केले नाही. सर्व समाजघटकांना न्याय देत विकासाचा धडाका लावला. म ाझ्यासारख्या सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्त्याला जिल्हा परिषदेचे तिकीट देऊन त्यांनी विश्वास



दाखवला. त्यामुळे मी राष्ट्रवादीशी इमानदार राहिलो असून आजही सम ाजहितासाठी काम करत आहे, असे गायकवाड यांनी स्पष्ट केले.

विरोधकांनी जिल्ह्यातील राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांकडून सातत्याने विकासकामे मंजूर करून घेतली. पंचायत समिती व जिल्हा परिषदेची तिकीटे घेतली. सत्तेचा लाभ उपभोगला. मात्र स्वार्थ साध्य होताच त्यांनी पक्ष बदलला. अशा संधीसाधू आणि दलबदलू लोकांना जनता यावेळी त्यांची जागा नक्की दाखवेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

लोणी काळभोर-कदम वाकवस्ती-वडकी जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादीकडून शीतल सुजित कांबळे, लोणी काळभोर-वडकी पंचायत समि ती गणातून रेश्मा युवराज काळभोर, तर कदमवाकवस्ती पंचायत समिती गणातून अमोल टेकाळे हे अधिकृत उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. सध्या या तिन्ही उमेदवारांचा प्रचार वेगाने सुरू असून, घराघरांत जाऊन थेट जनतेशी संवाद साधला जात आहे. महिला, युवक, शेतकरी आणि ज्येष्ठ नागरिकांकडून घड्याळ या निवडणूक चिन्हाला मोठा पाठिंबा मिळत असल्याचे स्पष्ट होत आहे.

दरम्यान, लोणी काळभोर गट व गणात राष्ट्रवादी काँग्रेसने विकासाच्या मुद्द्यावर भक्कम पकड निर्माण केली असून तिन्ही उमेदवार प्रचंड मताधिक्याने निवडून येणार आहेत. घराघरात राष्ट्रवादीच्या कार्याची चर्चा असून नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. या निवडणुकीत जनता विकासासोबत इमानदारीला मत देणार असून राष्ट्रवादीचे तिन्ही उमेदवार घवघवीत मतांनी विजयी होतील, असा ठाम दावा संजय गायकवाड यांनी केला.

## संक्षिप्त



### पुणे-मुंबई हायस्पीड बुलेट ट्रेन कधी होणार सुरू?

**पुणे, ता. ४ :** पुणे आणि मुंबई या दोन महानगरांना जोडणारे अंतर आता तासांऐवजी मिनिटांवर येणार आहे. बहुप्रतिक्षित 'मुंबई-पुणे हायस्पीड रेल्वे' प्रकल्पाबाबत रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी महत्त्वपूर्ण घोषणा केली. येत्या ५ वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे लक्ष्य रेल्वे मंत्रालयाने ठेवले असून, यामुळे राज्याच्या दळणवळण क्षेत्रात मोठी क्रांती होणार आहे. रेल्वेमंत्र्यांनी स्पष्ट केले की, हायस्पीड रेल्वेसारखे भव्य प्रकल्प आता ५ वर्षांच्या 'डेडलाईन'मध्ये पूर्ण केले जातील. विशेष म्हणजे, हा केवळ रेल्वे मार्ग नसेल, तर प्रवाशांच्या सोयीसाठी दर १५ ते २० मिनिटांच्या अंतराने बुलेट ट्रेन सोडण्याचे नियोजन आहे. याचा अर्थ असा की, प्रवाशांना वेळेचे बंधन पाळावे लागणार नाही; एखाद्या लोकल ट्रेनप्रमाणेच बुलेट ट्रेन प्रवाशांच्या सेवेसाठी उपलब्ध असेल. यंदाच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रातील रेल्वेच्या जाळ्याचा विस्तार करण्यासाठी २३,९२३ कोटी रुपयांची विक्रमी तरतूद करण्यात आली आहे. सध्या राज्यात १ लाख ७० हजार कोटी रुपयांचे प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. हायस्पीड रेल्वेमुळे पुणे-मुंबई दरम्यानचा प्रवास तर वेगवान होईलच, पण या मार्गालगत नवीन औद्योगिक शहरे आणि निवासी क्षेत्राचाही झपाट्याने विकास होणार आहे.

### अजित पवारांचा शेवटचा संवाद जो ऐकून महाराष्ट्र सुन्न झाला

**बारामती, ता. ४ :** राजकारणातील 'सडेतोड' व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाणारे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आता आपल्यात नाहीत. विमान अपघाताच्या त्या भीषण घटनेने महाराष्ट्र सुन्न झाला असला, तरी दादांच्या आयुष्यातील शेवटची काही मिनिटे नेमकी कशी होती, हे आता समोर आले आहे. अपघाताच्या काही वेळ आधी अजितदादा पक्षाच्या कामात आणि कार्यकर्त्यांच्या शंकांचे समाधान करण्यात मग्न होते, याचे पुरावे एका ऑडिओ क्लिपद्वारे समोर आले आहेत. अजित पवार यांचे पुतणे श्रीजीत पवार यांनी ही माहिती उघड केली आहे. जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, माळी समाजाला पुरेसे प्रतिनिधित्व मिळत नसल्याची शंका एका कार्यकर्त्याने उपस्थित केली होती. श्रीजीत यांनी हाच मुद्दा मेसेजद्वारे दादांच्या कानावर घातला. सकाळी ८:१९ वाजता केलेल्या त्या मेसेजला अजितदादांनी विमानातूनच फोन करून उत्तर दिले. ऑडिओ क्लिपमध्ये दादा म्हणतात कि, बाळा, तुला काही माहिती नसतं... आपण सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन चालतो, असे म्हणत त्यांनी सुप्यात माळी समाजाला आणि इतर ठिकाणी ओबीसी उमेदवारांना दिलेल्या संधी बद्दल सांगितले आणि कार्यकर्त्याची शंका दूर केली. विमानात असताना, जिथे सर्वजण विश्रांती घेतात, तिथेही दादांच्या डोक्यात पक्षाची रणनीती आणि सामाजिक न्यायाचा विचार सुरू होता. अपघातापूर्वीही दादा फक्त कामाचाच विचार करत होते.

### मोक्का कारवाईनंतरही लक्ष्मी आणि सोनाली आंदेकर पुन्हा बाहेर

**पुणे, ता. ४ :** पुणे महानगरपालिकेच्या आगामी महापौर निवडीच्या पार्श्व भूमीवर आयुष कोमकर हत्या प्रकरणात न्यायालयीन कोठडीत असलेल्या आंदेकर कुटुंबाला मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. या प्रकरणात नगरसेवक लक्ष्मी आंदेकर आणि सोनाली आंदेकर या सध्या कोल्हापूर कारागृहात न्यायालयीन कोठडीत आहेत. त्यांच्यावर आयुष कोमकर हत्या प्रकरणात कट रचल्याचा आरोप आहे. या गंभीर आरोपांमुळे त्यांना तुरुंगात ठेवण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुणे महानगरपालिकेच्या म हापौर निवडीसाठी होणाऱ्या विशेष सभेत मतदान करण्यासाठी लक्ष्मी आंदेकर आणि सोनाली आंदेकर यांना तात्पुरत्या स्वरूपात बाहेर आणण्याबाबत हालचाली सुरू झाल्या आहेत. या निवडणुकीत प्रत्येक मत महत्त्वाचे असल्याने, संबंधित राजकीय पक्षांकडून आपल्या नगरसेविकांना मतदानासाठी उपस्थित ठेवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या संदर्भात कायदेशीर प्रक्रिया तपासून, काही तासांसाठी किंवा एक दिवसासाठी न्यायालयीन कोठडीतून बाहेर येण्याची परवानगी मिळू शकते, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

### मुलगा हवाय तर पतीला प्रेयसीशी लग्न करू दे; सासरच्यांची अट

**भिवंडी, ता. ४ :** एकीकडे आपण डिजिटल इंडिया आणि स्त्री-पुरुष समानतेच्या गप्पा मारत असताना, भिवंडीतून समोर आलेल्या एका घटनेने अनेकजण सुन्न झाले आहे. 'वंशाचा दिवा' म्हणून मुलगाच हवा, या हट्टामुळे एका ३५ वर्षीय महिलेला तिच्या तीन चिमुरड्या मुलींसह भररस्त्यात सोडून देण्यात आले. केवळ मुलगा झाला नाही, यामुळे महिलेसोबत असे करण्यात आले. पीडितेचा विवाह २०२२ मध्ये प्रकाश कांबळे याच्याशी झाला होता. लग्नानंतर तिला तीन मुली झाल्या. तिसऱ्या मुलीच्या जन्मानंतर सासरच्या मंडळींचा खरा चेहरा समोर आला. पीडितेच्या तक्रारीनुसार, तिला केवळ शारीरिक त्रास दिला गेला नाही, तर तिच्यावर मानसिक दबाव टाकण्यात आला. सासरच्यांनी तिला चक्क अशी अट घातली की, आम्हाला वंशाचा दिवा हवा आहे, त्यामुळे पती प्रकाशला त्याच्या प्रेयसीशी दुसरे लग्न करण्याची परवानगी दे.

# अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचा कलगीतुरा

## शरद पवारांनी फडणवीसांना सुनावले

**पुणे, ता. ४ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली असली, तरी त्यांच्या पश्चात 'राष्ट्रवादीच्या विलीनीकरणा'वरून राजकीय युद्ध पेटले आहे. या वादात आता खुद्द ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी उडी घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर थेट निशाणा साधला आहे.

अजित पवारांच्या निधनानंतर 'राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)' पक्षाच्या नेत्यांनी असा दावा केला होता की, निधनापूर्वी अजितदादांची शरद पवारांशी चर्चा झाली होती आणि दोन्ही गट लवकरच एकत्र येणार होते. मात्र, महायुतीमधील नेते प्रफुल्ल पटेल आणि देवेंद्र फडणवीस यांनी हा दावा फेटाळून लावला. अशी कोणतीही चर्चा झाली असती तर दादांनी आम्हाला नक्कीच सांगितले असते, असे फडणवीस म्हणाले होते.



**शरद पवारांचा पलटवार**

बारामती येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत शरद पवारांनी अत्यंत मोजक्या पण धारदार शब्दांत मुख्यमंत्र्यांच्या विधानाचा समाचार घेतला. पवारांच्या भूमिकेतील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे:

हक्क कोणाचा? : या विलीनीकरणाच्या चर्चेत फडणवीस कुठेच नव्हते, मग त्यांना माझ्याबद्दल भाष्य करण्याचा अधिकार कोणी दिला? असा सवाल पवारांनी उपस्थित केला.

सध्याचे प्राधान्य: सध्या आमचे संपूर्ण लक्ष या संकटातून सावरून परस्परांना धीर देण्यावर आहे, राजकीय चर्चांवर नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

सुनेत्रा पवारांचे स्वागत: अजितदादांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा उपमुख्यमंत्री म्हणून झालेला शपथविधी आनंदाची बाब असल्याचे सांगत पवारांनी कौटुंबिक सौहार्द जपले.

**हे का महत्त्वाचे आहे?**

**राजकीय वारसा :** अजित पवारांच्या निधनानंतर त्यांच्या समर्थकांची मोट नेमकी कोणाकडे वळणार, हे या विलीनीकरणाच्या चर्चेवर अवलंबून आहे.

**महायुती वि. महाविकास आघाडी :** विलीनीकरणाच्या दाव्यामुळे महायुतीमध्ये संभ्रम निम र्ण करण्याचा प्रयत्न होत असल्याचे फडणवीसांचे मत आहे, तर पवार आपली 'स्पेस' जपण्याचा प्रयत्न करत आहेत.

**सहानुभूतीची लाट :** बारामती आणि महाराष्ट्रात अजितदादांबद्दल असलेल्या सहानुभूतीचा राजकीय फायदा कोणाला मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### पुण्यात तरुणावर कोयत्याने सपासप वार

**पुणे, ता. ४ :** पुणे शहरात गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत भररस्त्यात एका तरुणावर कोयत्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना २ फेब्रुवारी रोजी रात्री सुमारे ८:३० वाजण्याच्या सुमारास घडली असून, संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव आदित्य सुनील कांबळे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काही तरुणांनी आदित्यवर अचानक हल्ला केला. कोयत्याने वार करताना आरोपी अत्यंत क्रूर पद्धतीने हल्ला करत असल्याचे सीसीटीव्हीमध्ये दिसून येत आहे. जीव वाचवण्यासाठी आदित्य हल्लेखोरा समोर गयावया करत होता, मात्र आरोपींनी कोणतीही दया दाखवली नाही. हल्ला इतका गंभीर होता की आदित्य रक्ताच्या थारोळ्यात पडला. नागरिकांनी आदित्यला रुग्णालयात दाखल केले.

## केंद्र सरकारच्या निर्णयामुळे शेतकरी संकटात; नेमका काय होणार परिणाम?

**बारामती, ता. ४ :** जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिकेसोबतचा नवा व्यापार करार भारतासाठी फायद्याचा की तोट्याचा? यावर आता देशाच्या राजकारणात चर्चा सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी या कराराबाबत धोक्याची घंटा वाजवली असून, यामुळे भारतीय शेतकऱ्यांचे कंबरडे मोडण्याची भीती व्यक्त केली आहे. बारामती येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी या गंभीर विषयावर भाष्य केले.



भारत आणि अमेरिका यांच्यातील नव्या व्यापार कराराचा सविस्तर मसुदा अद्याप गुलदस्त्यात आहे. मात्र, प्राथमिक माहितीनुसार अमेरिकेला आता त्यांचे कृषी उत्पादन भारतात मोठ्या प्रमाणावर निर्यात करण्याची सवलत मिळणार असल्याचे संकेत मिळत आहेत. शरद पवार यांच्या मते, अमेरिका हा आर्थिकदृष्ट्या अत्यंत शक्तिशाली देश आहे. तिथले शेती उत्पादन जास्त असून त्यांना मोठे अनुदान मिळते. जर अमेरिकन धान्य किंवा कृषी माल भारतीय बाजारपेठेत स्वस्त दरात येऊ लागला, तर आपल्या स्थानिक शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळणार नाही. जेव्हा एखादा शक्तिशाली देश दुसऱ्या देशात शेतीमाल विकतो, तेव्हा तिथल्या स्थानिक कृषी अर्थव्यवस्थेवर त्याचे विपरीत परिणाम होतात. भारतीय शेतकऱ्यांच्या बाबतीत असे घडू नये, हीच माझी अपेक्षा आहे, असे पवार यांनी स्पष्ट केले.

अजित पवारांच्या दुर्दैवी अपघातामुळे यंदा त्यांना संसदेत उपस्थित राहता आले नाही, तरीही त्यांनी अर्थसंकल्पाचा बारकाईने अभ्यास केला आहे. सामान्य माणसाला त्रास होईल असा कोणताही नवा कर लादला नाही, ही जमेची बाजू आहे. मात्र, विकासाला गती देण्यासाठी जे ठोस निर्णय अपेक्षित होते, ते या अंदाजपत्रकात दिसत नाहीत, असे त्यांनी नमूद केले.

## अजितदादांचे अर्थखाते हाती घेताच फडणवीसांनी घेतला मोठा निर्णय

**मुंबई, ता. ४ :** राज्याच्या अर्थकारणावर पकड मजबूत करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सूत्रे हाती घेताच महत्वाचे निर्णय घेतले आहे. मार्च महिना जवळ येत असताना सरकारी विभागांकडून होणारी अनावश्यक खरेदी आणि निधी संपवण्यासाठी चाललेली घाई रोखण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी नवीन निविदा काढण्यावर तात्काळ बंदी घातली आहे.

आर्थिक वर्षाच्या शेवटच्या टप्प्यात अनेक विभागांकडून फर्निचर, संगणक, उपकरणे आणि कार्यालयीन दुरुस्तीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर खर्च केला जातो. हा खर्च अनेकदा गरजेपेक्षा 'निधी खर्च करणे' या उद्देशाने केला जातो. या मनमानीला आळा घालण्यासाठी १५ फेब्रुवारीपासून कोणत्याही खरेदी प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता न देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. फर्निचर दुरुस्ती, नवीन यंत्रसामग्री,



सेमिनार आणि अगदी कार्यालये भाड्याने घेण्यावरही निर्बंध लादले आहेत. लाडकी बहीण' सारख्या महत्वाकांक्षी योजनांमुळे राज्याच्या तिजोरीवर मोठा भार पडला आहे. अशा वेळी ६ मार्च रोजी सादर होणाऱ्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पापूर्वी अनावश्यक खर्च टाळून वित्तीय तूट मर्यादित ठेवण्याचे मोठे आव्हान फडणवीस यांच्यासमोर असून पुढे अजून कोणते महत्वाचे निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## एकटीने कॅब प्रवास करणाऱ्या महिलांसाठी धोक्याची घंटा

**पुणे, ता. ४ :** पुणे शहरात महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. बाणेर परिसरात मोबाईल ॲपवरून कार बुक केलेल्या एका ४२ वर्षीय महिलेचा कारचालकाने विनयभंग केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणामुळे शहरातील प्रवासी सेवा आणि महिलांची सुरक्षितता याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. याप्रकरणी बाणेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिलेने रविवारी १ फेब्रुवारी रोजी सकाळच्या सुमारास प्रवासासाठी एका प्रसिद्ध मोबाईल ॲपवरून कार बुक केली होती. प्रवास सुरळीत पार पडला. मात्र, प्रवास संपल्यानंतर बाणेर भागात कार थांबल्यावर भाड्याच्या




रकमेवरून चालक आणि महिलेमध्ये वाद झाला. सुरुवातीला हा वाद किरकोळ स्वरूपाचा होता, पण काही वेळातच चालकाने वादाला वेगळे वळण दिले.

भाड्याच्या वादातून संतप्त झालेल्या चालकाने महिलेशी हुज्जत घालण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्याने महिलेशी गैरवर्तन करत तिचा विनयभंग केला. या अनपेक्षित प्रकारामुळे महिला प्रचंड घाबरली. ती मदतीसाठी आरडाओरडा करणार इतक्यातच आरोपी कारचालक घटनास्थळावरून पसार झाला.

या घटनेनंतर पीडित महिलेनं तातडीने बाणेर पोलीस ठाणे गाठले आणि घडलेला प्रकार पोलिसांना सांगितला. पोलिसांनी तिच्या तक्रारीवरून संबंधित कारचालकाविरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. मोबाईल ॲपमधील माहिती, वाहन क्रमांक आणि चालकाच्या तपशीलाच्या आधारे आरोपीचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. बाणेर पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून आरोपीला लवकरात लवकर अटक करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, महिलांनी प्रवासादरम्यान आवश्यक ती काळजी घ्यावी, आपत्कालीन बटणांचा वापर करावा आणि कोणताही गैरप्रकार घडल्यास तात्काळ १०० किंवा ११२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## टेम्पोच्या धडकेत पोलीस कर्मचारी पुलावरून खाली कोसळले

**मुंबई, ता. ४ :** मुंबईतील लोअर परळ परिसरात मंगळवारी सायंकाळी एक धक्कादायक अपघात घडला. सेनापती बापट मार्गावरील दत्ता नलावडे पुलावर अचानक बिघाड झाल्याने एका टेम्पोचालकाने आपले वाहन भर रस्त्यात वळवले. याच वेळी दुचाकीवरून जाणाऱ्या एका पोलीस कॉन्स्टेबलला टेम्पोची जोरदार धडक बसली. या धडके मुळे दुचाकीस्वाराचा तोल गेला आणि ते थेट पुलावरून खाली कोसळले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

या अपघातात वांद्रे पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस कॉन्स्टेबल अंकित सुर्वे जखमी झाले आहेत. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, टेम्पो चालकाने अचानक वाहन वळवल्याने सुर्वे यांना





स्वतःला सावरण्याची संधी मिळाली नाही. धडक इतकी जोरदार होती की ते दुचाकीसह पुलावरून खाली पडले. हा प्रसंग पाहून काही क्षणांसाठी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निम र्ण झाले होते. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि पोलिसांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. जखमी अवस्थेत असलेल्या सुर्वे यांना त्वरित जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांना गंभीर स्वरूपाच्या जखमा झालेल्या नसून सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे. वेळेवर उपचार मिळाल्याने मोठा अनर्थ टळल्याचे सांगण्यात येत आहे.

ही घटना ना. म. जोशी मार्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असून संबंधित पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली आहे. टेम्पो चालकाला ताब्यात घेण्यात आले असून अपघाताचे नेमके कारण काय होते, याचा तपास सुरू आहे. या घटनेमुळे काही काळ सेनापती बापट मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलीस आणि वाहतूक विभागाने परिस्थिती नियंत्रणात आणल्यानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली.

## प्रियकराचा खून करण्यासाठी आईनेच दिली पोटच्या मुलाला 'सुपारी'

**पिंपरी-चिंचवड, ता. ४ :** पिंपरी-चिंचवड परिसरात एक धक्कादायक हत्येचा प्रकार उघडकीस आला असून, प्रियकराच्या सततच्या त्रासाला कंटाळून प्रेयसीने आपल्या मुलगा आणि त्याच्या मित्राच्या मदतीने प्रियकराची हत्या केल्याचे समोर आले आहे. ही घटना पुणे जिल्ह्यातील चाकण परिसरात घडली असून, उत्तर चाकण पोलिसांनी सुम ारे २० दिवसांच्या तपासानंतर तिघा आरोपींना अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंजा धोंडीबा नरहरे वय २५ आणि उषा नानासाहेब चव्हाण वय ४० यांच्यात गेल्या ६ वर्षांपासून संबंध होते. उषा चव्हाण विवाहित असून गेल्या काही महिन्यांपासून मुंजा नरहरे तिला मारहाण करत होता आणि मानसिक व शारीरिक त्रास देत होता. या त्रासामुळे उषा चव्हाण हैराण झाली होती. पुण्यात कामासाठी आलेल्या




आपल्या मुलगा निखिल नानासाहेब चव्हाण वय २१ याच्याकडे तिने आपली व्यथा मांडली.

आईवर होणाऱ्या अत्याचाराची माहिती मिळाल्यानंतर निखिल चव्हाण संतप्त झाला. त्यानंतर उषा चव्हाण, निखिल चव्हाण आणि निखिलचा मित्र स्वप्नील नरहरी पारधी यांनी मुंजा नरहरेची हत्या करण्याचा कट रचला. ७ जानेवारी रोजी उषा चव्हाण हिने मुंजा नरहरे याला चाकण येथे भेटण्यासाठी बोलावले. गंगाखेड येथून चाकणला आल्यानंतर निखिल आणि स्वप्नील यांनी दुचाकीवरून त्याला सोबत नेले.

त्यानंतर खराबवाडी परिसरातील मद्यविक्री दुकानातून दारू खरेदी करून बिरदवाडी येथील ओढ्याजवळील निर्मनुष्य ठिकाणी तिघांनी दारू पिण्यास सुरुवात केली. याच वेळी निखिल आणि स्वप्नील यांनी मुंजा नरहरेवर कोयत्याने वार करून त्याची हत्या केली. ओळख पटू नये म्हणून मृतदेहाचा चेहरा दगडाने ठेचण्यात आला.

११ जानेवारी रोजी त्या परिसरात अज्ञात मृतदेह आढळल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. घटनास्थळी सापडलेल्या दारूच्या बाटल्या आणि सिगारेटच्या आधारे पोलिसांनी तपासाची दिशा ठरवली. पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करत अखेर तिघा आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## तरुणाला लिफ्ट देण्याचा बहाणा करून चौघांकडून अपहरण, मारहाण नंतर लुटले

**पुणे, ता. ४ :** पुणे स्टेशनकडे जाण्यासाठी शास्त्रीनगर चौकात थांबलेल्या एका तरुणाला लिफ्ट देण्याचा बहाणा करून चौघांनी अपहरण करत मारहाण व लुबाडणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी गुन्हे शाखेच्या युनिट ४ च्या पथकाने तिघांना अटक केली असून एक आरोपी फरार आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये राहुल किसन सावंत (वय १९, रा. समर्थनगर, खराडी, मूळ रा. आंबेजोगाई, जि. बीड), निशांत झुंबर बागुल (वय २१, रा. चिखलठाण, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) आणि महेश रामकिशन सोनटक्के (वय २०, रा. खांदवेनगर, गीताई पार्क,



लोहगाव) यांचा समावेश आहे.

आरोपींकडून फिर्यादीचा चोरलेला मोबाईल, आरोपींचे तीन मोबाईल, गुन्ह्यासाठी वापरलेली स्विफ्ट डिझायर कार आणि लोखंडी कोयता असा एकूण ७ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी प्रेमजी पाटीदार (वय ४२, रा. नरपतगिरी चौक, सोमवार पेठ) यांनी येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना ३० जानेवारी रोजी रात्री दहा ते ३१ जानेवारी रोजी पहाटे अडीचच्या दरम्यान घडली.

फिर्यादी प्रेमजी पाटीदार हे ३० जानेवारी रोजी रात्री शास्त्रीनगर चौकात थांबले असताना, पांढऱ्या रंगाच्या डिझायर कारमधून आलेल्या चौघांनी लिफ्ट देतो असे सांगून त्यांना गाडीत बसवले. त्यानंतर बंडगार्डन परिसरात फिरवत त्यांना मारहाण करण्यात आली. आरोपींनी जबरदस्तीने मोबाईलवरील गुगल पे ॲपद्वारे १८ हजार ८०० रुपये ट्रान्सफर करून घेत मोबाईल काढून घेतला आणि त्यांना रस्त्यात सोडून फरार झाले.

दरम्यान, गुन्हे शाखा युनिट ४ चे पथक चंदननगर परिसरात पेट्रोलिंग करत असताना, संबंधित गुन्ह्यातील आरोपी खराडी येथील हॉटेल जत्रा येथे कारसह थांबले असल्याची माहिती बातमीदारामार्फत मिळाली. माहितीची खात्री करून पोलिसांनी कारवाई करत तिघांना ताब्यात घेतले. सुरुवातीला आरोपी उडवाउडवीची उत्तरे देत होते; मात्र विश्वासात घेऊन चौकशी केल्यानंतर त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर त्यांना येरवडा पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले.

सदर कारवाई अपर पोलीस आयुक्त पंकज देशमुख, पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे, सहायक पोलीस आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांचन जाधव, पोलीस उपनिरीक्षक वैभव मगदूम तसेच गुन्हे शाखेच्या पथकाने केली आहे.

पुणे प्राईम न्यूज



## पिंपरी-चिंचवड महापालिकेत राष्ट्रवादीच्या गटनेतेपदी भाऊसाहेब भोईर

**पिंपरी-चिंचवड, ता. ४ :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गटनेतेपदी ज्येष्ठ नगरसेवक भाऊसाहेब भोईर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बुधवारी ही अधिकृत घोषणा करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस हा महापालिकेतील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा पक्ष असल्याने, गटनेता म्हणून भाऊसाहेब भोईर हे विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारीही पार पाडणार आहेत. या निर्णयामुळे महापालिकेतील राजकीय हालचालींना वेग आला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुका अजित पवार यांनी प्रतिष्ठेचा विषय मानल्या होत्या. उमेदवारांची निवड, प्रचाराचे नियोजन आणि रणनीती आखण्यापर्यंत अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या त्यांनी स्वतः हाताळल्या. निवडणूक प्रचारादरम्यान त्यांनी महापालिकेतील कामकाजावर आणि कथित भ्रष्टाचारावरून स्थानिक भाजप नेत्यांवर टीका केली होती. त्यामुळे ही निवडणूक चांगलीच गाजली होती.

निवडणूक निकालानंतर राष्ट्रवादी काँग्रेसला एकूण ३७ जागांवर विजय मिळाला. अपेक्षेपेक्षा कमी यश मिळाले असले तरी पक्ष दुसऱ्या क्रमांकावर राहिला. त्यामुळे विरोधी पक्षनेतेपदाचा मान राष्ट्रवादी काँग्रेसकडे आला. या पदासाठी पक्षातील अनेक वरिष्ठ नेत्यांची नावे चर्चेत होती.

माजी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, माजी महापौर वैशाली घोडेकर आणि अनेक वेळा नगरसेवक राहिलेले संदीप वाघेरे यांची नावे प्रामुख्याने समोर होती. संदीप वाघेरे यांची निवड होण्याची शक्यता जास्त मानली जात होती, कारण त्यांनी प्रभाग क्रमांक २१ पिंपरी गाव जिजामाता रुग्णालय परिसरात चारही जागांवर विजय मिळवून दिला होता.

## भाजपच्या उमेदवार पूनम गायकवाडवर गुन्हा दाखल

**लोणी काळभोर, ता. ४ :** जिल्हा परिषद निवडणुकीच्या ऐन तोंडावर लोणी काळभोर गटातील भाजपच्या अधिकृत उमेदवार पूनम बाबुराव गायकवाड यांच्यावर द्विभार्या कायद्यासह मानसिक छळ, बदनामी व आर्थिक फसवणुकीचे गंभीर आरोप ठेवत गुन्हा दाखल करण्यात आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात सिद्धेश्वर नामदेव काळभोर, कथित पत्नी पूनम गायकवाड, दीर नवनाथ काळभोर, जाऊ स्नेहल काळभोर, मावशी नंदा बोत्रे, निर्मला चौधरी, मामा दत्तात्रय भाडळे, वृषाली बोत्रे व प्रणाली बोत्रे अशा नऊ जणांविरोधात लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. एका महिला पोलिसाने दिलेल्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, पीडिता व सिद्धेश्वर काळभोर हे कायदेशीर पती-पत्नी असून दोघांमध्ये घटस्फोट झालेला नाही.

# हिंजवडी आणि हडपसरमध्ये उभारली जाणार बुलेट ट्रेनची भव्य स्थानकं

### पुणेकरांचं स्वप्न 'हाय-स्पीड'वर; काय आहे 'मास्टरप्लॅन'?

**पुणे, ता. ४ :** देशात बहुप्रतिक्षित बुलेट ट्रेन प्रकल्प प्रत्यक्षात उतरण्याची घडी जवळ आली असून पुण्यासाठी ही मोठी दिलासादायक बातमी आहे. मुंबईपुणे आणि पुणेहैदराबाद बुलेट ट्रेन मार्गाचे काम लवकरच सुरू होणार असल्याची माहिती पुढे आली आहे. हा संपूर्ण प्रकल्प दुहेरी मार्गिकेचा असून, पुणे शहर थेट देशाच्या हाय-स्पीड रेल्वे नेटवर्कशी जोडले जाणार आहे.

मुंबईपुणे बुलेट ट्रेन मार्गावर सुमारे ४५ किलोमीटर लांबीचे बोगदे आणि उड्डाणपूल प्रस्तावित आहेत. सह्याद्रीच्या डोंगररांगा आणि लोणावळा परिसरातील भौगोलिक



मर्यादा लक्षात घेता या मार्गावर लोणावळ्यात स्थानक उभारणे शक्य नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे पुण्याच्या पश्चिम भागातील हिंजवडी येथे बुलेट ट्रेनचे पहिले स्थानक उभारण्याचा प्रस्ताव निश्चित मानला जात आहे. आयटी हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिंजवडीमुळे या स्थानकाला मोठी प्रवासी संख्या मिळेल, असा अंदाज आहे.

पुण्यातील दुसरे बुलेट ट्रेन स्थानक हडपसर परिसरात उभारले जाण्याची शक्यता आहे. मूळ आराखड्यात शहराच्या मध्यवर्ती भागात स्थानकाचा विचार होता. मात्र, जागेची कमतरता, प्रचंड जमीनदर आणि भूसंपादनातील अडचणींमुळे तो पर्याय बाद करण्यात आला. हडपसर हा पुणेसोलापूर राष्ट्रीय महामार्ग, प्रस्तावित मेट्रो मार्ग आणि भविष्यातील वाहतूक नियोजनाच्या दृष्टीने अधिक अनुकूल ठरत असल्याने येथे स्थानक उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विशेष म्हणजे पुणेहैदराबाद बुलेट ट्रेन मार्ग सोलापूर महामार्गाला समांतर जाणार असल्याने हडपसर स्थानक रणनीतिकदृष्ट्या महत्त्वाचे ठरेल.

पुण्यातील दोन बुलेट ट्रेन स्थानकांसाठी सुमारे ४००० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. ताशी ३५० किलोमीटर वेगाने धावणाऱ्या या ट्रेनसाठी स्थानकांची रचना अत्याधुनिक आणि उच्च सुरक्षा मानकांनुसार केली जाणार आहे, रेल कॉर्पोरेशनने मुंबई-पुणे-हैदराबाद मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल आधीच सादर केला असून निधी मिळताच दोन्ही मार्गांवरील काम एकाच वेळी सुरू होणार आहे.

हा प्रकल्प पूर्ण झाल्यास पुणेमुंबई प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईलच, शिवाय पुण्याचे औद्योगिक, आयटी आणि व्यापारी महत्त्व अधिक वाढणार आहे. पुणे देशाच्या प्रमुख महानगरांशी अतिवेगवान रेल्वेने जोडले जाणे, ही शहराच्या विकासाच्या दृष्टीने मोठी झेप ठरणार आहे.

# मुंबई-पुणे एक्सप्रेसवे गॅस टँकर उलटला; वाहतूकीचा मार्ग बदलला

**मुंबई, ता. ४ :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर मंगळवारी सायंकाळी आडोशी बोगद्याजवळ घडलेल्या अपघाताने अवघ्या महाराष्ट्राचं लक्ष वेधून घेतलं. अत्यंत ज्वलनशील प्रोपलीन गॅस वाहून नेणारा टँकर थेट बोगद्याच्या तोंडाशी उलटल्याने मोठ्या स्फोटाचा धोका निर्माण झाला आणि महामार्गावरील वाहतूक अक्षरशः ठप्प झाली.

पुण्याहून मुंबईच्या दिशेने येणारा हा टँकर आडोशी बोगद्याजवळील तीव्र वळणावर चालकाचं नियंत्रण सुटल्यामुळे पलटी झाला. अपघातानंतर काही वेळातच टँकरम धून प्रोपलीन गॅसची गळती सुरू झाली. हा गॅस हवेत मिसळताच अत्यंत वेगाने पेट घेऊ शकतो. बोगद्याजवळील




बंदिस्त परिसर, वाहनांची गर्दी आणि संध्याकाळची वेळ लक्षात घेता, अगदी लहान ठिणगीही भीषण स्फोटाला कारणीभूत ठरू शकली असती. त्यामुळे प्रशासनाने तातडीने मुंबईकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद केली.

या निर्णयामुळे सुरक्षितता राखली गेली, पण त्याचा फटका हजारो प्रवाशांना बसला. तब्बल १५ तासांहून अधिक काळ एक्सप्रेसवे ठप्प राहिला. काही वाहनचालक रात्रीभर रस्त्यावरच अडकून पडले. पुण्याच्या दिशेने एकाच लेनवरून मर्यादित वाहतूक सुरू करण्यात आली, मात्र बोरघाट परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या.

गळती अजूनही पूर्णपणे थांबलेली नसल्याने टँकर हटवणं धोकादायक ठरत आहे. तज्ज्ञ पथक गॅस नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न करत असून परिस्थिती पूर्णपणे सुरक्षित होईपर्यंत आडोशी बोगद्याकडील मुंबई मार्गिका बंदच राहणार आहे.

या घटनेमुळे धोकादायक रसायनांची वाहतूक, घाटातील तीव्र वळणं आणि आपत्कालीन व्यवस्थापन याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. प्रवाशांनी सध्या लोणावळाखंडाळा मार्ग टाळावा. दक्षिण मुंबईकडे जाणाऱ्यांनी ताम्हिणी घाट, तर ठाणेकल्याणकडे जाणाऱ्यांनी माळशेज घाट मार्गाचा वापर करावा. प्रवासाचा वेळ वाढू शकतो, त्यामुळे इंधन, पाणी आणि आवश्यक तयारी करूनच निघणं अत्यंत गरजेचं आहे.

# पार्थ, जय पवारांसह शरद पवारांची बैठक; सुनेत्रा पवारांच्या शपथीनंतर राजकीय हालचालींना वेग

**बारामती, ता. ४ :** राष्ट्रवादी काँग्रेसच्यासंभाव्यविलीनीकरणावरून राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा हालचालींना वेग आला आहे. एकीकडे पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिवंगत अजित पवार यांनी विलीनीकरणाबाबत कोणतीही चर्चा केली नव्हती, असं स्पष्ट करत या चर्चांवर पाणी फेरलं आहे. मात्र दुसरीकडे बारामतीत घडणाऱ्या घडामोडींमुळे या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत आज विद्या प्रतिष्ठानमध्ये संस्थेची बैठक पार पडली. या बैठकीला अजित पवारांचे पुत्र पार्थ पवार आणि जय पवार यांच्यासह संस्थेचे विश्वस्त



उपस्थित होते. अधिक लक्षवेधी बाब म्हणजे, संस्थेच्या कामकाजावर चर्चा झाल्यानंतर शरद पवार यांनी पार्थ आणि जय पवार यांच्यासोबत स्वतंत्र बैठक घेतल्याची माहिती समोर आली आहे. या बंद दरवाजाआड झालेल्या चर्चेमुळे राजकीय घडामोडींना पुन्हा एकदा उधाण आलं आहे.

सुनेत्रा पवार यांच्या उपमुख्यमंत्रिपदाच्या शपथविधीनंतर शरद पवारांनी आपल्याला याबाबत माहिती नव्हती असं जाहीरपणे सांगितल्यानंतर पवार कुटुंबात तणावाची चर्चा सुरू झाली होती. मात्र त्यानंतर लगेचच पार्थ पवार यांनी गोविंदबाग येथे शरद पवारांची भेट घेतल्याने संवादाचे दार पुन्हा उघडल्याचं चित्र आहे.

या पार्श्वभूमीवर अजित पवारांचे निकटवर्तीय किरण गुजर यांनी केलेला दावा अधिक महत्त्वाचा ठरतो. दोन्ही राष्ट्रवादींचं विलीनीकरण ही अजित पवारांची इच्छा होती आणि ती पूर्ण करण्याची जबाबदारी आता पार्थ पवार पार पाडतील. पवार कुटुंबातील सर्व सदस्य यासाठी सकारात्मक आहेत, असा दावा त्यांनी केला होता.

आज झालेल्या बैठकीनंतर या चर्चांना पुन्हा बळ मिळालं असलं, तरी या बैठकीत नेमकं काय ठरलं, याबाबत राष्ट्रवादीकडून अद्याप अधिकृत भूमिका मांडण्यात आलेली नाही. मात्र बारामतीतील या भेटीमुळे राष्ट्रवादीच्या राजकारणात पुढील काळात मोठे बदल घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.






Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

प्राईम लाईफ



## तुमच्याही कानात सतत ‘शिट्टी’सारखा आवाज येतोय? वेळीच व्हा सावध

**पुणे, ता. ४ :** शांत बसलेले असताना अचानक कानात ‘शिट्टी’ वाजल्यासारखा किंवा ‘घोंगावणारा’ आवाज येतो? जर तुम्हालाही असा अनुभव येत असेल, तर याला केवळ भ्रम समजून दुर्लक्ष करू नका. वैद्यकीय भाषेत याला ’टिनिटस’ असे म्हणतात. सध्याच्या धावपळीच्या आणि आवाजाच्या प्रदूषणात ही समस्या वेगाने वाढत असून, यामुळे मानसिक तणाव आणि बहिरेपणाचा धोका निर्माण होऊ शकतो.

नेमकं काय आहे ‘टिनिटस’?

‘टिनिटस’ म्हणजे बाहेरून कोणताही आवाज येत नसतानाही कानात विविध प्रकारचे आवाज ऐकूयेणे. हे आवाज दोन्ही कानात किंवा एकाच कानात येऊ शकतात. हा आजार नसून तो शरीरातील किंवा कानातील एखाद्या बिघाडाचे लक्षण आहे.

कानात आवाज येण्याची मुख्य कारणे : मोठ्या आवाजाचा संपर्क : हेडफोनचा अतिवापर, कारखान्यातील मशीनचा आवाज किंवा डीजेच्या आवाजामुळे कानातील नाजूक पेशींना इजा होते.

कानात मळ साचणे : कानाच्या पडद्याजवळ मळ साचल्याने आवाजाच्या लाटा अडथळा निर्माण करतात.

वाढते वय : वयोमानानुसार कानाची ऐकण्याची क्षमता कमी होते, ज्यामुळे टिनिटसचा त्रास सुरू होऊ शकतो.

रक्तदाब आणि मधुमेह : उच्च रक्तदाब किंवा रक्ताभिसरणातील दोषांमुळे कानाच्या नसांवर ताण येतो.

मानसिक तणाव : अति चिंता किंवा अपुऱ्या झोपेमुळेही कानात आवाज येण्याचे प्रमाण वाढते.

यावर उपाय काय?

तज्ज्ञ डॉक्टरांच्या मते, टिनिटसवर उपचार करताना आधी त्याचे मूळ कारण शोधणे गरजेचे असते.

कानाचा मळ काढणे: अनेकदा साध्या क्लिनिंगने हा त्रास दूर होतो.

आवाजाची पातळी कमी ठेवा: हेडफोन वापरताना आवाज ५० टक्क्यांपेक्षा कमी ठेवावा.

ध्वनी थेरपी : कानाला शांत ठेवण्यासाठी ध्वनी थेरपी केली जाते.

योगासने : रक्ताभिसरण सुधारण्यासाठी प्राणायाम आणि योगासने फायदेशीर ठरतात.

# यवत बोरीभडक जि. प. गटात मोठी चुरस

## नवखे उमेदवार असल्याने भाजपा-राष्ट्रवादी उमेदवारांची धावपळ

राहुलकुमार अवचट



पुणे, ता. ४ : दौंड तालुक्यातील यवत बोरीभडक जिल्हा परिषद गटामध्ये सहा उमेदवार निवडणूक लढत असून याठिकाणी मोठी चुरस निर्माण झाली आहे तर भाजपाच्या वतीने अविनाश कुदळे व राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने अमित कुदळे हे नवखे उमेदवार असल्याने मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी मोठी धावपळ सुरू आहे.

तालुक्यात कायमच आमदार राहुल कुल गट व माजी आमदार रमेश थोरात गट यांच्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत असून पूर्वीच्या यवत भांडगाव गटाचा आता यवत बोरीभडक गट झाला आहे . म ागील निवडणुकीत यवत भांडगाव गटात माजी आमदार रमेश थोरात गटाने येथे विजय संपादन केला होता यावेळी गणेश कदम हे जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आले तर दौंड तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या पैकी जागा व पंचायत समितीच्या जागांवर राष्ट्रवादी काँग्रेसने विजय मिळवून सत्ता स्थापन केली होती.

तालुक्यातील राजकीय दृष्ट्या यवत गाव हे महत्त्वाचे गाव असून यवत गटात आपली सत्ता यावी यासाठी दोन्ही गटांनी आपली ताकद पणाला लावली आहे. यवत बोरीभडक गटात भाजपा, राष्ट्रवादी, शिवसेना, काँग्रेस पक्ष्यांच्या व दोन अपक्ष उमेदवारांमध्ये लढत होत आहे. यवत पंचायत समितीसाठी दुरंगी तर बोरीभडक पंचायत समितीसाठी तिरंगी लढत होत आहे.

जिल्हा परिषदेच्या यवत बोरीभडक गटात निवडणुकीसाठी भाजपाचे अविनाश कुद्ळे, राष्ट्रवादीचे अमित कुद्ळे, शिवसेनेचे शुभम माळवे, काँग्रेसच्या सारिका भुजबळ, अपक्ष गणेश आखाडे व रामदास दोरगे या सहा जणांमध्ये लढत होत आहे . जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी अनेक नवखे उमेदवार असल्याने मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांची मोठी धावपळ होत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी अनेक आजी माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत सदस्य व पदाधिकारी एकत्रित प्रचार करत असून भाजपा उमेदवाराच्या प्रचारासाठी तरुणांनी धुरा आपल्याकडे घेतली आहे जिल्हा परिषदसाठी दोन्ही उमेदवार नवखे असून अविनाश कुदळे व अमित कुदळे यांनी केलेल्या सामाजिक उपक्रम व अजेंडा याबाबत कोणतीही प्रतिक्रिया उमेदवारांच्या वतीने मिळाली नाही तर शुभम माळवे यांनी महामार्गचे काही प्रश्न, सारिका भुजबळ यांनी महिला एकत्रीकरण, रामदास दोरगे गावातील विविध प्रश्न तर गणेश आखाडे यांनी गोहत्या बंदी, हिंदू एकत्रीकरण यासारखे सामाजिक उपक्रम केल्याचे सांगितले.

काल अपक्ष उमेदवार रामदास दोरगे यांनी अभिनेत्री माधुरी पवार यांची जाहीर सभेचे आयोजन केले होते परंतु सभेकडे मतदारांनी पाठ फिरवली असल्याचे चित्र दिसून आले . पंचायत समितीच्या यवत गणामध्ये भाजपाच्या तेजस्विनी पडळकर व राष्ट्रवादी काँग्रेसच्या अश्विनी पिंगळे यांच्यात दुरंगी तर बोरीभडक गणात भाजपाच्या राजश्री म्हस्के, राष्ट्रवादी काँग्रेसच्या साक्षी गव्हाणे व अपक्ष पुष्पा म्हस्के यांच्यात तिरंगी लढत होत आहे. सर्व उमेदवारांनी मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेण्यावर भर दिला. प्रचारासाठी अवघे दोन दिवस उरले असल्याचे प्रचाराचा जोर वाढलेला असून सर्वत्र राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, शिवसेना व अपक्ष यामध्ये कोण बाजी मारणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. याबाबत मतदारांमध्ये चांगलीच चर्चा होऊ लागली आहे. सध्या तरी सर्वत्र राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या लढतीमध्ये यवत, भांडगाव, कासुर्डी , सहजपूर, डाळिंब, बोरीभडक गावामधील मतदान निर्णायक ठरणार आहे यामुळे आपल्या गावात आपल्या पक्षाच्या उमेदवाराला आघाडी मिळावी यासाठी सर्व पदाधिकारी मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत आहेत.

### अपक्ष उमेदवारांचा भाजपला फटका बसण्याची शक्यता

यवत बोरीभडक जिल्हा परिषद गटात भाजपाचे अविनाश कुद्ळे हे निवडणूक लढवत असून याच गटात भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष गणेश आखाडे व आमदार राहुल कुल समर्थक रामदास दोरगे हे अपक्ष उमेदवार असल्याने या दोन्ही उमेदवारांना मिळणाऱ्या मताचा फटका भाजपाचे उमेदवार अविनाश कुदळे यांना बसू शकतो अशी चर्चा यवत परिसरात सर्वत्र सुरु आहे.

# पोलीस निरीक्षकाने फसवणुकीची तक्रार दाबत आरोपींना जामिनासाठी मदत

## सुनावणीला दांड्या अन् बेजबाबदारपणा पडला महागात

**नवी मुंबई, ता. ४ :** नवी मुंबई पोलीस दलात खळबळ उडवणारी कारवाई समोर आली असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक ब्रम्हानंद नाईकवाडी यांना निलंबित करण्यात आले आहे. फसवणुकीच्या तक्रार अर्जाची सखोल चौकशी न करता तो परस्पर दप्तरी दाखल करून आरोपींना अटकपूर्व जामीन मिळण्यास मदत केल्याचा गंभीर ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.


सध्या नवी मुंबई पोलीस मुख्यालयातील नियंत्रण कक्षात कार्यरत असलेल्या नाईकवाडी यांच्या भूमिकेबाबत झालेल्या चौकशीत अनेक गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत. सप्टेंबर २०२५



मध्ये युनूस कासम सोत आणि उमेश मनहरलाल उधानी यांच्यातील भूखंड तडजोड कराराच्या नावाखाली फसवणूक झाल्याचा तक्रार अर्ज दाखल झाला होता. मात्र या अर्जावर गुन्हा दाखल न करता ४ सप्टेंबर २०२५ रोजी प्राप्त झालेला अर्ज थेट ११ ऑक्टोबर २०२५ रोजी दप्तरी दाखल करण्यात आल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे.

या निष्काळजीपणाचा थेट फायदा घेत संबंधित आरोपींनी बेलापूर येथील अतिरिक्त सत्र न्यायालयातून अटकपूर्व जामीन मिळवला. विशेष म्हणजे या प्रकरणाच्या सुनावणीवेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नाईकवाडी स्वतः न्यायालयात हजर न राहता दुय्यम अधिकाऱ्याला पाठवण्यात आल्याचाही ठपका ठेवण्यात आला आहे.पोलीस अधिकाऱ्याने दाखवलेले हे बेजबाबदार वर्तन पोलीस दलाच्या प्रतिमेला धक्का देणारे असल्याचा निष्कर्ष प्रशासनाने काढला आहे. त्यामुळे कर्तव्यात कसूर, चौकशीतील हलगर्जीपणा आणि आरोपींना अप्रत्यक्ष मदत केल्याच्या कारणावरून ब्रम्हानंद नाईकवाडी यांना निलंबित करण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे नवी मुंबई पोलीस दलात एकच खळबळ माजली आहे.

# एका ‘क्लिक’मुळे पुण्यातील व्यापाऱ्याने गमावले ७.४१ लाख




**पिंपरी-चिंचवड, ता. ४ :** सोशल मीडियाचा एक छोटासा ‘क्लिक’ आयुष्यभराची पुंजी कशी साफ करू शकतो, याचा प्रत्यय भोसरीतील एका घटनेने आला आहे. केवळ व्हॉट्सॲप हॅक करून सायबर भामट्यांनी एका व्यापाऱ्याच्या पत्नीच्या बँक खात्यातून तब्बल ७ लाख ४१ हजार ६७१ रुपये लंपास केले आहेत.

शांतीनगर (भोसरी) येथील रहिवासी परिमल परीडा (३२) हे व्यावसायिक आहेत. १ जानेवारीच्या संध्याकाळी ५ च्या सुमारास, कोणत्याही ओटीपी शिवाय किंवा संशयास्पद फोनशिवाय त्यांचे व्हॉट्सॲप अचानक बंद पडले. सायबर चोरट्यांनी ‘तांत्रिक कौशल्याचा’ वापर करून त्यांच्या व्हॉट्सॲपचा पूर्ण ताबा मिळवला होता. व्हॉट्सॲप हॅक झाल्यानंतर चोरट्यांनी चॅट हिस्ट्री आणि मीडिया फाइल्सचा आधार घेत त्यांच्या बँक तपशिलांचा शोध घेतला.

परिमल यांच्या पत्नीचे इंडियन ओव्हरसीज बँकेत ‘करंट अकाऊंट’ आहे. हॅकरने या खात्याचा गोपनीय तपशील मिळवून अत्यंत शिताफीने एकापाठोपाठ एक अनेक व्यवहार करत ७ लाख ४१ हजार रुपयांहून अधिक रक्कम स्वतःच्या खात्यावर वळवून घेतली. ज्यावेळी बँकेचे मेसेज मोबाईलवर आले, तेव्हा परीडा कुटुंबाला धक्का बसला. याप्रकरणी आता भोसरी पोलिसांनी आयटी ॲक्ट नुसार गुन्हा दाखल केला असून सायबर सेल या प्रकरणाचा तांत्रिक तपास करत आहे.

# अजित पवारांना श्रद्धांजलीसाठी दिल्लीत होमहवन

## देशभरात पाठवले जाणार अस्थिकलश

**दिल्ली, ता. ४ :** महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसकडून दिल्लीतील राष्ट्रीय मुख्यालयात विशेष होमहवनचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचा उद्देश पवारांच्या स्मरणार्थ आध्यात्मिक श्रद्धांजली देणे आणि त्यांच्या कार्याची आठवण जिवंत ठेवणे असा आहे. हवनसोबत यज्ञ आणि पूजा आयोजित करून नंतर अस्थिकलश संपूर्ण देशभर पाठवण्यात येणार आहेत.

देशभरात अजित पवारांच्या स्मरणार्थ कलश पाठवण्याची सुरुवात ५ फेब्रुवारी २०२६ रोजी होईल. दिल्लीतील मुख्यालयावर हवन आणि पूजेचे विधी पार पडतील आणि तत्परतेने देशभरातील विविध पवित्र स्थळांवर कलश पोहचवले जातील. पहिल्या दिवशी दिल्लीच्या केंद्रीय टीमसह समर्थक हरिद्वारमधील हर की पौड़ीला, प्रयागराजमधील संगमला, गंगाजमिनी पटना, अमरकंटकमधील नर्मदा आणि ब्रह्मपुत्र नदी गुवाहाटीत तसेच लुधियानाला पोहोचवणार आहेत. कलशांचे वितरण तेलंगणा, कन्याकुमारीतील तीन सागरांचा संगम, वाराणसीतील गंगा, अहमदाबादमधील साबरमती, झेलम नदी, झारखंड इत्यादी ठिकाणी होईल. या उपक्रमाद्वारे राष्ट्रवादी पक्षाने देशभरातील विविध स्थळांवर पवारांच्या योगदानाची आठवण जागृत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. राजकीय दृष्टीकोनापेक्षा, हा उपक्रम एक सांस्कृतिक आणि आध्यात्मिक श्रद्धांजलीचा प्रकार असून देशभरातील पक्ष कार्यकर्ते आणि समर्थक यामध्ये सहभागी होऊन अजित पवार यांच्या स्मरणार्थ आदर प्रकट करणार आहेत.

# ट्रॅफिकचा नियम ५ वेळा मोडला की ३ महिने गाडी विसरा

**पुणे, ता. ४ :** पुणे शहरासह राज्यभरात वाहन चालवणाऱ्या नागरिकांनी आता अधिक काळजी घेणे आवश्यक ठरणार आहे. वाहतुकीचे नियम वारंवार मोडणाऱ्या वाहनचालकांवर कडक कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एका वर्षाच्या कालावधीत पाच वेळा वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास संबंधित व्यक्तीचा वाहन चालविण्याचा परवाना तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात येणार आहे. हा नियम नवीन वर्षापासून लागू करण्यात आला आहे.

देशभरात रस्ते अपघातांचे प्रमाण वाढत असून त्यात अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागत आहे. अपघातांमागे वेगमर्यादा ओलांडणे, सिग्नल तोडणे, हेल्मेट किंवा सीटबेल्ट न वापरणे यांसारखी कारणे मोठ्या प्रमाणात दिसून येतात. याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने केंद्रीय मोटार वाहन कायदा १९८९ मध्ये सुधारणा केली असून नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. नवीन नियमानुसार,एकावर्षातपाचवेळानियम मोडल्यास ड्रायव्हिंग लायसन्स तीन महिन्यांसाठी निलंबित होईल. तसेच सिग्नल तोडणे, हेल्मेट न घालणे, सीटबेल्ट न लावणे यांसारख्या चुकांचाही या कारवाईत समावेश करण्यात आला आहे. याशिवाय, एका वर्षात एकाच वाहनावर पाच वेळा कारवाई झाल्यास त्या वाहनाची नोंदणी काही काळासाठी रद्द केली जाणार आहे.

नोंदणी रद्द झाल्यानंतर वाहनाला फिटनेस प्रमाणपत्र, बँक कर्ज, परमिट किंवा एनओसी मिळणार नाही. वाहनाचे नूतनीकरण किंवा हस्तांतरण करतानाही अडचणी येणार आहेत. नियमभंग केल्यास संबंधित वाहनधारकाला तीन दिवसांच्या आत ऑनलाइन पद्धतीने ई-चलन पाठवले जाईल. या चलनावर आक्षेप घेण्यासाठी किंवा दंड भरण्यासाठी ४५ दिवसांची मुदत दिली जाईल. दिलेल्या मुदतीत दंड न भरल्यास वाहन ब्लॅकलिस्ट करण्यात येईल. त्यानंतर लायसन्स आणि नोंदणीशी संबंधित सर्व प्रक्रिया थांबवण्यात येणार आहेत. ई-चलनावर आक्षेप फेटाळल्यास वाहनधारकाला न्यायालयात दाद मागता येईल, मात्र त्यासाठी दंडाच्या ५० टक्के रकमेचा भरणा करणे बंधनकारक असणार आहे. परिवहन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, नियमांचे पालन केल्यासच ही कारवाई टाळता येणार आहे.

# मनोज जरांगे यांना गोळ्या घालण्याची धमकी; ऑडिओ कॉल व्हायरल

## धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड नावांचा समावेश

**बीड, ता. ४ :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यासंबंधी एक गंभीर धमकीचा प्रकार समोर आला आहे. सोशल मीडियावर एका ऑडिओ क्लीपने तुफान खळबळ उडवली असून त्यात मनोज जरांगे यांना गोळ्या घालून ठार करण्याची धमकी देण्यात आली आहे. ही कॉल रेकॉर्डिंग जरांगे समर्थक आणि धनंजय मुंडे व संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड यांच्या समर्थकांमध्ये झालेल्या संभाषणाची असल्याचा दावा केला जात आहे.



ऑडिओ क्लिपमध्ये एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला मनोज जरांगे यांना मारण्याची धमकी दिली आहे. संभाषणात असेही म्हटले जाते की, जर गरज भासली तर स्वतः गोळ्या घालून जरांगे यांचा जीव घेतला जाईल. या कॉलमध्ये धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांची नावे घेऊन धमक्या दिल्याचेही सांगितले जात आहे.

हे संभाषण सोशल मीडियावर व्हायरल झाल्यामुळे बीड जिल्ह्यात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. जरांगे समर्थक आणि कराड समर्थकांमध्ये या दोन्ही गटांमध्ये कोणत्या परिस्थितीत हे बोलणे झाले, यावर सध्या चर्चा सुरू आहे.

मनोज जरांगे यांनी यापूर्वी माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले होते की, त्यांच्यावर खून करण्याची सुपारी दिली गेली. या प्रकरणी काही जणांना अटकही करण्यात आली होती, पण त्यानंतर पुढील कारवाईबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

सध्या पोलीस आणि प्रशासन या प्रकरणाकडे बारकाईने लक्ष ठेवत असून, कोणत्याही संभाव्य घटनांना रोखण्यासाठी सुरक्षा वाढवण्यात आली आहे. सोशल मीडिया आणि व्हायरल ऑडिओमुळे परिस्थिती संवेदनशील राहिल्याने स्थानिक लोकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले जात आहे.

# पुणे स्टेशनला सोडतो म्हणत तरुणाला लुटले; अनोळखी वाहनात न बसण्याचे आवाहन

**पुणे, ता. ४ :** पुण्यातील नगर रस्ता परिसरात रात्रीच्या वेळी प्रवाशांना लिफ्ट देण्याच्या बहाण्याने लुटणारी टोळी सक्रिय असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पुणे रेल्वे स्टेशनला सोडतो असे सांगून एका तरुणाला कारमध्ये बसवण्यात आले आणि पुढे चालकासह त्याच्या चार साथीदारांनी तरुणाला धमकावत लूट केल्याची घटना घडली. या प्रकरणी येरवड्यातील लक्ष्मीनगर पोलीस चौकीत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी नागरिकांना अनोळखी वाहनात बसू नये, असे आवाहन केले आहे.



पीडित तरुण नरपतगिरी चौक परिसरात राहतो. रात्रीच्या सुमारास तो नगर रस्त्यावरून घरी जाण्यासाठी वाहनाची वाट पाहत थांबला असताना एक कार त्याच्याजवळ आली. चालकाने आपण पुणे स्टेशनकडेच चाललो असून सोडतो, अशी विचारणा केली. रात्री उशीर झालेला आणि वाहन मिळत नसल्याने तरुणाने विश्वास ठेवून कारमध्ये बसण्याचा निर्णय घेतला.

कार काही अंतर पुढे गेल्यानंतर वातावरण अचानक बदलले. चालकासह कारमधील इतर चार जणांनी तरुणाला धमकावून त्याच्याकडील मौल्यवान वस्तू आणि रोख रक्कम काढून घेतली. लूट केल्यानंतर टोळीने त्याला निर्जन ठिकाणी उतरवून कारसह पसार होण्याचा प्रकार केला. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे तरुण प्रचंड घाबरला असून, त्याने कसाबसा पोलीस ठाणे गाठत तक्रार नोंदवली.

या घटनेनंतर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. कार कोणत्या मार्गाने गेली, वाहनाचा क्रमांक आणि आरोपींची ओळख पटवण्यासाठी विशेष पथके कार्यरत करण्यात आली आहेत. प्राथमिक तपासात शहरात अशाच पद्धतीने लिफ्ट देऊन लूट करणाऱ्या टोळ्या सक्रिय असल्याचे संकेत मिळत आहेत.

# मुंबई–पुणे मार्गावर महाप्रलय; पुण्यातून सुटणाऱ्या सर्व एसटी फेऱ्या रद्द

**पुणे, ता. ४ :** मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील आडोशी बोगदा परिसरात गॅस टँकर उलटून सुमारे २१ तास उलटून गेले तरी वाहतूक अद्याप पूर्ववत झालेली नाही. या अपघातामुळे एक्सप्रेसवेवर अभूतपूर्व वाहतूक कोंडी निर्माण झाली असून, हजारो प्रवासी तासनतास रस्त्यावर अडकून पडले आहेत. परिस्थिती नियंत्रणात न आल्याने एसटी प्रशासनाने पुण्यातून मुंबईकडे जाणाऱ्या सर्व एसटी बस फेऱ्या तात्पुरत्या स्वरूपात रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

मागील जवळपास २२ तासांपासून प्रवाशांचे प्रचंड हाल सुरू आहेत. अनेक वाहनांमध्ये अडकलेल्या प्रवाशांना अन्न-पाण्याविना ताटकळत बसावे लागले. उष्णतेमुळे परिस्थिती आणखी बिकट झाली असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. काही ठिकाणी पाण्याचा एक घोट मिळवण्यासाठीही प्रवाशांना संघर्ष करावा लागल्याचे चित्र दिसून आले.




या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाने मुंबई सेंट्रल, दादर, ठाणे आणि बोरीवलीकडे जाणाऱ्या पुण्याहून सुटणाऱ्या सर्व बसेसच्या फेऱ्या पुढील काही तासांसाठी रद्द केल्या आहेत. वाहतूक कोंडी कायम असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे एसटी प्रशासनाने स्पष्ट केले असून, एक्सप्रेसवेवरील वाहतूक सुरळीत झाल्यानंतर पुढील निर्णय जाहीर केला जाईल, असेही सांगण्यात आले आहे.

दरम्यान, काल दुपारी साडे चारच्या सुमारास उलटलेल्या प्रोपोलिन गॅस टँकरमुळे मोठ्या प्रमाणात गळती सुरू झाली होती. सुरक्षेच्या कारणास्तव द्रुतगती महामार्गावरील वाहतूक थांबवण्यात आली आणि त्याचे पडसाद आता ५० किलो मीटरपर्यंत पसरलेल्या वाहनांच्या रांगांमध्ये दिसून येत आहेत.

प्रशासनाकडून टँकर हटवण्याचे आणि गॅस गळती पूर्णपणे थांबवून वाहतूक पूर्ववत करण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू आहेत. मात्र कामाला होत असलेल्या विलंबामुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी आहे. अशा कठीण परिस्थितीत स्थानिक सेवाभावी संस्था आणि काही स्वयंसेवकांनी पुढाकार घेत अडकलेल्या प्रवाशांना हजारो पाण्याच्या बाटल्या वितरित केल्या. या मदतीमुळे अनेक प्रवाशांना काहीसा दिलासा मिळाला असून, संकटात माणुसकीचे दर्शन घडल्याची भावना व्यक्त केली जात आहे.